Corporate Communications & Investor Relations
**Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5**
**TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495**

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्र व राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड ) यांच्यात सामंजस्य करार

पुणे दिनांक १६ जुलै २०२१ : देशातील सार्वजनिक क्षेत्रातील अग्रगण्य बँक ऑफ महाराष्ट्र आणि राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) यांच्यातील सामंजस्य करारावर बँकेच्या मुख्यालयात आयोजित समारंभात सह्या करण्यात आल्या.

बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा व राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या ( नाबार्ड ) पुणे प्रादेशिक कार्यालयाचे मुख्य सरव्यवस्थापक श्री जी एस रावत यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. संस्थात्मक कर्जवाटप व आणि चालू असलेले विकास उपक्रम यांचे एकत्रीकरण करून ग्रामीण समृद्धीला चालना देणे या हेतूने ह्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. बँक ऑफ महाराष्ट्राच्या कृषी,व प्राधान्यक्षेत्र वित्तपुरवठा, एफ.आय.विभागाचे सरव्यवस्थापक व राज्य अग्रणी बँक समितीचे निमंत्रक श्री एम ए काबरा व राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या ( नाबार्ड ) पुणे प्रादेशिक कार्यालयातील सरव्यवस्थापक श्रीमती रश्मी दराडे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या .

शेतीला उत्तेजन आणि ग्रामीण विकास या क्षेत्रातील समान हितसंबंध लक्षात घेऊन बँक ऑफ महाराष्ट्र आणि नाबार्ड हे चालू असणाऱ्या विकास उपक्रमांना चालना देण्यासाठी एकमेकांना सहकार्य करतील. यामुळे महाराष्ट्र राज्यातील शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, सामाजिक दायित्व गट, स्व-मदत गट, ग्रामीण कामगार, विणकर, कृषिउद्योजक, कृषि स्टार्टअप, सूक्ष्म, लघु व मध्य उद्योग इत्यादींना लाभ होईल असे अनेक उपक्रम बँक ऑफ महाराष्ट्रा व राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या ( नाबार्ड ) संयुक्तपणे सुरु करणार आहेत व राबविणार आहेत .
श्री हेमंत टम्टा यांनी सांगितले की बँक ऑफ महाराष्ट्र ही राज्यातील अग्रणी बँक असल्यामुळे सन १९७६ पासून राज्यस्तरीय अग्रणी बँक समितीचे निमंत्रकपद भूषवित आहे. तसेच राज्यस्तरीय अग्रणी बँक समितीचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या ( नाबार्ड ) पुणे प्रादेशिक कार्यालयाच्या कामगिरीची श्री टम्टा यांनी दखल घेतली. राज्यस्तरीय अग्रणी बँक समितीचे सभासद असलेल्या बँकांना व राज्यातील जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यांनी कृषि गुंतवणूक पतपुरवठा /

मुदत कर्जे यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रभावी मार्गदर्शन करण्यासाठी नाबार्ड सर्व प्रकारे प्रयत्नशील आहे.

सदर सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्यामुळे बँक ऑफ महाराष्ट्र व नाबार्ड हे महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी कामगिरीची नवीन शिखरे गाठतील
असा विश्वास श्री हेमंत टम्टा यांनी व्यक्त केला .

Corporate Communications & Investor Relations

**Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5**

**TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495**




Photo Caption:( L to R) Mr. Hemant Tamta, Executive Director, BoM; Mr. M.A. Kabra, General Manager, Credit Priority –Agriculture, FI & SLBC, BoM;Smt. Rashmi Darad, General Manager, NABARD; Mr. G.S. Rawat, Chief General Manager, NABARD

**छायाचित्रात डावीकडून उजवीकडे :** बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा , बँक ऑफ महाराष्ट्राच्या कृषी,व प्राधान्यक्षेत्र वित्तपुरवठा, एफ.आय.विभागाचे सरव्यवस्थापक व राज्य अग्रणी बँक समितीचे निमंत्रक श्री एम ए काबरा, राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या ( नाबार्ड ) पुणे प्रादेशिक कार्यालयातील सरव्यवस्थापक श्रीमती रश्मी दराडे व राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या ( नाबार्ड ) पुणे प्रादेशिक कार्यालयाचे मुख्य सरव्यवस्थापक श्री जी एस रावत